दिनांक : २७.०८.२०१९

**विषय : कोजागिरी (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी ई निविदा करीता आयोजित निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त..**

कोजागिरी कॅन्टीन (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०१९-२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई निविदेसाठी निविदापूर्व बैठक दिनांक २६.०८.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता पीएमबी बिल्डींग, तिसरा मजला येथे लेखाशाखेतील समिती कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

१. M/s Hotel Royal Taste, Pune
२. M/s Ranjeet Services, Pune
३. M/s Bharati Associates, Pune
४. M/s Prithvi Hospitality, Pune
५. M/s Unique Hospitality, Pune
६. M/s Akshayaa Caterers, Pune

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री. सतिश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री. प्रसाद आचार्य, उप निबंधक
३. श्री .देवराम शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण कक्ष
४. श्री. अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक
५. श्री .मुकुंद वीर, प्रकल्प सहायक (तांत्रिक)

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted आहे किंवा कसे या बाबतचा मुद्दा M/s Hotel Royal Taste व M/s Prithvi Hospitality चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | MSME चे प्रमाणपत्र जर भोजन व्यवस्था सेवेसाठी नोंदणी केली असेल व प्रमाणपत्र upload केले असेल तर EMD परत करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| २. | शाकाहारी व मांसाहारी सेवा पुरविल्याचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थेचे किंवा इतर खाजगी संस्थेचे चालेल का फक्त शासकीय संस्थेचेच पाहिजे किंवा कसे या बाबतचा मुद्दा M/s Hotel Royal Taste व M/s Prithvi Hospitality चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | शाकाहारी व मांसाहारी सेवा पुरविल्याचे प्रमाणपत्र कोणत्याही संस्थेचे चालेल. फक्त त्यात शाकाहारी व मांसाहारी भोजनव्यवस्था समाधानकारक चालवत असल्याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ३. | मेस बील किती दिवसांत सादर करुन ते किती दिवसांत आमच्या खात्यात पैसे जमा होतात त्याबद्दल माहिती देण्याबाबतचा मुद्दा M/s Akshayaa Caterers चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | याबाबत निविदा अट क्र. ३० चे अवलोकन करावे असे सांगण्यात आले. जास्त कालावधींच्या कोर्सची देयके कोर्स संपल्यानंतर सादर करावी व त्या देयकांची रक्कम साधारणपणे १५ ते ३० दिवसांच्या कालावधीत आपल्या खात्यात जमा होईल असे सांगण्यात आले. |
| ४. | BoQ मध्ये न्युनतम दर कसे भरायचे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | BOQ मधील Part-१ हा Excel मध्ये upload करणे तसेच Part-२ हा PDF format मध्ये upload करणे बाबत सूचना देण्यात आल्या. तसेच Excel sheet मधील दर हे L-१ साठी ग्राह्य धरण्यात येतील. असेही स्पष्ट करण्यात आले. |
| ५. | कचरा व वेस्टेज ची विल्हेवाट कोण लावणार त्याबाबत M/s Ranjeet Services चे प्रतिनिधी यांनी विचारणा केली | यशदा भोजन व्यवस्थेसाठी अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. १४ नुसार कचरा व वेस्टेजची विल्हेवाट संबंधित ठेकेदाराने संस्थेच्या आवाराबाहेर जबाबदारीने मनपा नियमानुसार करणे बंधनकारक आहे, असे स्पष्ट करण्यात आले. |
| ६. | प्रत्येक वर्षी Turnover Certificate ५० लाखाचे सरसकट चालेल की फक्त केटरिंग/भोजन व्यवस्थेचेच असणे जरुरी आहे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील प्रति वर्षाचे केटरिंग/भोजन व्यवस्थेचेच Chartered Accountant यांनी दिलेले वार्षिक किमान ५० लाखाचे Turnover Certificate आवश्यक आहे, असे सांगण्यात आले. |

निविदा भरणे अगोदर संबंधित सर्व निविदादारांनी संपूर्ण निविदेचे काळजीपूर्वक वाचन करुन, सर्व कागदपत्रे निविदेतील मागणीनुसार upload करण्याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने सर्व निविदादारांच्या प्रतिनिधींना सूचना देवून बैठक समाप्त करण्यात आली.

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

प्रसाद आचार्य
(उप निबंधक)

देवराम शेळके
(लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण)

सतिश तडकसे
(वित्तीय सल्लागार)